# साप्ताहिक चालू घडामोडी 01 ऑगस्ट ते 07 ऑगस्ट 2021

## राष्ट्रीय बातम्या

### जी 20 सांस्कृतिक मंत्र्यांच्या बैठकीसाठी मीनाकाशी लेखी भारताचे नेतृत्व करणार

- **जी 20 सांस्कृतिक मंत्र्यांच्या** बैठकीसाठी भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्त्व भारताच्या **सांस्कृतिक राज्यमंत्री मीनाक्षी लेखी** यांनी केले.
- ही बैठक **इटलीच्या** अध्यक्षतेखाली **29 आणि 30 जुलै 2021** रोजी आयोजित करण्यात आली होती. चर्चेच्या शेवटी, जी20 सांस्कृतिक मंत्र्यांनी जी20 सांस्कृतिक कार्यगटाच्या संदर्भ अटी स्वीकारल्या.

### केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री "बायोटेक-प्राइड" सुरु केले

- केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाने **"बायोटेक-प्राइड (विदा देवाणघेवाणद्वारे संशोधन आणि नवकल्पनांचा प्रचार**) मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत."
- बायोटेक-प्राईड मार्गदर्शक तत्वे **बायोटेक्नॉलॉजी विभागाने** (डीबीटी) विकसित केली आहेत. ही मार्गदर्शक तत्त्वे जैविक ज्ञान, माहिती आणि डेटाची देवाणघेवाण आणि देवाणघेवाण सुलभ आणि सक्षम करण्यासाठी योग्यरित्या परिभाषित आराखडा आणि मार्गदर्शक तत्त्व प्रदान करण्याच्या उद्देशाने आणली आहेत.
- **भारतीय बायोलॉजिकल डेटा सेंटर** (आयबीडीसी) द्वारे मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी केली जाईल..

### क्यूएस बेस्ट स्टुडंट सिटीज क्रमवारीत मुंबई, बेंगळुरूने पहिल्या 100 तील स्थान गमावले

- **क्यूएस बेस्ट स्टुडंट सिटीजच्या** ताज्या क्रमवारीत **मुंबई** आणि **बेंगळुरू** जागतिक पहिल्या -100 च्या यादीतून बाहेर पडत अनुक्रमे **106** आणि **110** स्थान मिळवले आहे.
- **लंडनने** सलग तिसऱ्या आवृत्तीत जगातील सर्वोत्तम विद्यार्थी शहर म्हणून आपली स्थिती कायम ठेवली आहे. त्यानंतर **म्युनिक** शहर आहे.

### सुरक्षित धरणांसाठी भारत आणि जागतिक बँकेचा संयुक्त प्रकल्प

- धरणांच्या दीर्घकालीन सुरक्षेसाठी आणि भारतातील विविध राज्यांमधील विद्यमान धरणांची सुरक्षा आणि कामगिरी सुधारण्यासाठी **भारत आणि जागतिक बँकेने 250 दशलक्ष** डॉलर्सच्या संयुक्त प्रकल्पाला मंजुरी दिली आहे.
- **द्वितीय धरण पुनर्वसन आणि सुधारणा प्रकल्प** (डीआरआयपी 2) करार जागतिक बँक, भारत सरकार, केंद्रीय जल आयोग आणि 10 सहभागी राज्यांचे सरकारी प्रतिनिधी यांच्यात झाला. केंद्रीय जल आयोगाच्या (सीडब्ल्यूसी) माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर हा प्रकल्प राबवला जाईल.
- **छत्तीसगड, गुजरात, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, ओडिशा, राजस्थान आणि तामिळनाडू** या राज्यांमध्ये अंदाजे 120 धरणे या प्रकल्पात समाविष्ट आहेत.

### भारतीय ऑलिम्पिक चमू स्वातंत्र्यदिनी अतिथी म्हणून उपस्थित राहणार

- पंतप्रधान **नरेंद्र मोदी** यांनी 15 ऑगस्ट रोजी **भारताच्या ऑलिम्पिक चमूला** स्वातंत्र्यदिनाच्या **सोहळ्यासाठी विशेष पाहुणे** म्हणून आमंत्रण दिले आहे. तसेच संवादासाठी मोदी आपल्या निवासस्थानी चमूला आमंत्रित करणार आहेत.

### राज्यपाल कैद्यांना क्षमा करू शकतात: सर्वोच्च न्यायालय

- 3 ऑगस्ट 2021 रोजी **सर्वोच्च न्यायालयाने** निर्णय दिला की **राज्याचे राज्यपाल** फाशीच्या प्रकरणांसह कैद्यांना माफी देऊ शकतात. यासाठी **14 वर्षे तुरुंगवासाची** शिक्षा पूर्ण होण्याची अट असणार नाही.
- कोर्टाने असेही म्हटले आहे की, राज्यपालांना माफी देण्याचा अधिकार फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम **433 ए** अंतर्गत दिलेल्या तरतुदीला मागे टाकतो.
- न्यायालयाने नमूद केले की, **कलम 161** अन्वये कैद्याला माफी देण्याची राज्यपालांची सार्वभौम शक्ती प्रत्यक्षात राज्य सरकार वापरते, राज्यपालाने नाही.

### केंद्रीय मंत्रिमंडळाची जलदगती विशेष न्यायालये सुरू ठेवण्यास मंजुरी

- केंद्रीय **मंत्रिमंडळाने आणखी दोन वर्षांसाठी** केंद्र पुरस्कृत योजना म्हणून **389 विशेष पोक्सो न्यायालयांसह** 1,023 **जलदगती विशेष न्यायालये** सुरू ठेवण्यास मान्यता दिली आहे.
- केंद्रीय मंत्री **अनुराग ठाकूर** म्हणाले, 31 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांपैकी 28 राज्यांनी ही योजना सुरू केली आहे. पश्चिम बंगाल हे एकमेव राज्य आहे जिथे योजना सुरू केली नाही.
- ही योजना **1 एप्रिल 2021 पासून 31 मार्च 2023** पर्यंत चालू राहील, ज्याचा खर्च 1572.86 कोटी रुपये असून केंद्राचा वाटा **'निर्भया'** निधीतून दिला जाईल.
- **2 ऑक्टोबर 2019** रोजी ही योजना सुरू करण्यात आली. **गुन्हेगारी कायदा (सुधारणा) कायदा, 2018** लागू करण्यात आला ज्यामध्ये बलात्काराच्या गुन्हेगारांना फाशीच्या शिक्षेसह कडक शिक्षेची तरतूद करण्यात आली. यान्वये फास्ट ट्रॅक विशेष न्यायालयांची स्थापना करण्यात आली.

### सीबीआयसीने अनुपालन माहिती पोर्टल (सीआयपी) सुरू केले

- केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाने भारतीय **सीमाशुल्क अनुपालन माहिती पोर्टल www.cip.icegate.gov.in/CIP** येथे सुरू केले आहे.




### 2031 पर्यंत भारताची अणुऊर्जा क्षमता 22,480 मेगावॅट होईल

- भारताची **आण्विक उर्जा क्षमता 2031** पर्यंत सध्याच्या 6,780 मेगावॅटवरून **22,480 मेगावॅट** पर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे जे आहे.
- सध्या एकूण 6780 मेगावॅट क्षमतेचे 22 अणुभट्ट्या कार्यरत आहेत आणि एक अणुभट्टी, **केएपीपी -3 (700 मेगावॅट)** 10 जानेवारी 2021 रोजी ग्रिडशी जोडली गेली आहे.
- **8000 मेगावॅट** क्षमतेचे 500 मेगावॅट पीएफबीआर सह भारतीय नाभिकीय विद्युत निगम लिमिटेड {भाविनी} द्वारे कार्यान्वित 10 अणुऊर्जा प्रकल्प निर्माणाधीन आहेत.
- याव्यतिरिक्त, शासनाने फ्लीट मोडमध्ये स्थापन करण्यासाठी प्रत्येकी 700 मेगावॅटच्या दहा स्वदेशी प्रेशराईज्ड हेवी वॉटर रिॲक्टर्स (पीएचडब्ल्यूआरएस) ची प्रशासकीय मान्यता आणि आर्थिक मंजुरी दिली आहे.

### ट्रायफेड ने आपला 34 वा स्थापना दिवस साजरा केला

- **भारतीय आदिवासी सहकारी विपणन महासंघाने** (ट्रायफेड) **6 ऑगस्ट** रोजी आपला **34 वा** स्थापना दिवस साजरा केला आहे.
- ट्रायफेड ची स्थापना आदिवासी उत्पादनांना, हस्तकला आणि नॉन-टिम्बर फॉरेस्ट प्रोड्यूस (एनटीएफपी) साठी वीपणन सहाय्याद्वारे आदिवासींच्या विकासाला हातभार लावण्यासाठी करण्यात आली.
- **6 ऑगस्ट 1987** रोजी आदिवासींच्या सामाजिक-आर्थिक विकासाचे प्रमुख उद्दिष्ट असलेल्या राष्ट्रीय स्तरावरील सहकारी संस्था म्हणून ट्रायफेड ची स्थापना करण्यात आली

### नियामक प्रशिक्षण देण्यासाठी ई-प्रमाणन कार्यक्रम

- **उर्जा मंत्री आर के सिंह** यांनी नियामक प्रशिक्षण देण्यासाठी, **'ऊर्जा क्षेत्रासाठी सुधारणा आणि नियामक ज्ञानाचा आधार'** हा ई-प्रमाणपत्र कार्यक्रम सुरू केला आहे.
- आर के सिंह यांनी **आयआयटी कानपूरने** विकसित केलेले विदा डॅशबोर्डचे अनावरण केले ज्याद्वारे प्रत्येक राज्यातील वीज दर आणि वीज डिस्कॉम (वितरण कंपन्या) कामगिरीचे चे विश्लेषण दिले असेल.

## राज्य बातम्या

### लडाखने 'पानी माह' अभियान सुरु केले

- **लडाखमध्ये** ग्रामस्थांना स्वच्छ पाण्याचे महत्त्व कळवण्यासाठी **'पाणी माह' किंवा पाणी महिना** अभियान सुरू करण्यात आले.
- लडाख सरकारने **'हर घर जल'चा** दर्जा प्राप्त करणाऱ्या प्रत्येक जिल्ह्यातील पहिल्या **ब्लॉकसाठी 25 लाख** रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे.
- जल जीवन मिशन अंतर्गत जल गुणवत्ता आणि सेवा वितरणावर प्रभावी देखरेखीसाठी **पाणी सभा/ग्रामसभा/ब्लॉक** स्तरावरील बैठका आणि घरोघरी भेटी आयोजित करण्यावर दुसऱ्या टप्प्यात भर देण्यात येईल

### भारताची पहिली हार्ट फेल्युअर बायोबँक

- देशातील पहिली हृदय रुग्णांची **जैवबँक** केरळच्या **श्री चित्र तिरुनाल इन्स्टिट्यूट फॉर मेडिकल सायन्सेस अँड टेक्नॉलॉजी (एससीटीआयएमएसटी)** येथील **नॅशनल सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड रिसर्च अँड एक्सलन्स इन एचएफ (केअर-एचएफ)** मध्ये सुरु करण्यात आली.
- जैवबँक हृदयरोग असलेल्या रुग्णांमध्ये आरोग्य परिणामांचे अनुवांशिक, मेटाबोलॉमिक्स आणि प्रोटिओमिक मार्करचा अभ्यास करण्यासाठी उपयोगात येणार आहे.

### उत्तराखंडने भारतातील पहिले भूकंप मोबाइल ॲपचे अनावरण केले

- उत्तराखंडचे मुख्यमंत्री **पुष्करसिंह धामी** यांनी **'उत्तराखंड भुकंप अलर्ट'** नावाने भूकंप चेतावणी देणारे पहिले मोबाइल ॲप्लिकेशनचे अनावरण केले आहे.
- **आयआयटी रुरकीने उत्तराखंड राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (युएसडीएमए)** च्या सहकार्याने हे ॲप विकसित केले आहे.
- सुरुवातीला, हे ॲप केवळ प्रायोगिक तत्त्वावर भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालयाने उत्तराखंडच्या गढवाल क्षेत्रासाठी सुरु केले होते.

### कोव्हीड -19 विरुद्ध 100% लसीकरण करणारे भुवनेश्वर हे पहिले भारतीय शहर

- **100 टक्के** कोव्हीड -19 लसीकरण साध्य करणारे **भुवनेश्वर** हे **पहिले** भारतीय शहर बनले आहे.
- भुवनेश्वर महानगरपालिकेने (बीएमसी) कोव्हीड -19 विरूद्ध मोठ्या प्रमाणात लसीकरण मोहीम सुरू केली होती.

## आंतरराष्ट्रीय बातम्या

### आयएमएफ ने $650 बिलीयन चे विशेष आहरण अधिकार मंजूर केले

- **आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ)** च्या कार्यकारी मंडळाने जागतिक तरलता वाढवण्यास मदत करण्यासाठी आयएमएफ **विशेष आहरण अधिकार (एसडीआर)** मध्ये **650 अब्ज डॉलर्सची** विक्रमी सर्वसाधारण वाटप मंजूर केली आहे.
- 650 अब्ज डॉलर्सच्या एसडीआर वाटपाचे उद्दीष्ट सदस्य देशांना, विशेषत: उदयोन्मुख आणि विकसनशील देशांना, कोरोनाव्हायरस साथीच्या आजाराशी आणि त्यातून निर्माण झालेल्या आर्थिक मंदीशी लढण्यासाठी सहाय्य करणे आहे..

### श्रीलंकेत जगातील सर्वात मोठा तारा नीलमणी क्लस्टर सापडला

- **श्रीलंकेच्या रत्नापुरामध्ये** जगातील सर्वात मोठा **तारा नीलमणी क्लस्टर** सापडला आहे. रत्नापुरा ही देशाची रत्न राजधानी म्हणून ओळखली जाते.
- नीलमणी क्लस्टरचे वजन सुमारे **510 किलो** किंवा 2.5 दशलक्ष कॅरेट आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात याचे अंदाजे मूल्य **$100 दशलक्ष** आहे.




## नियुक्ती बातम्या

### जॉन अब्राहम: युरोस्पोर्ट इंडिया मोटोजीपीचे सदिच्छादूत

- **युरोस्पोर्ट इंडियाने** बॉलिवूड सुपरस्टार आणि मोटोजीपी उत्साही **जॉन अब्राहम** यांची त्यांच्या प्रमुख मोटरस्पोर्ट प्रॉपर्टी **मोटोजीपी™** साठी भारतातील सदिच्छादूत म्हणून नियुक्ती केली आहे. जॉन **"मोटोजीपी, रेस लगाते है"** या उपक्रमाअंतर्गत कंपनीची जाहिरात करणार आहे.
- युरोस्पोर्ट इंडिया सध्या भारतीय मोटरस्पोर्ट्सच्या चाहत्यांसाठी एफआयए फॉर्म्युला 2 चॅम्पियनशिप, डब्ल्यू सीरिज, नास्कर, इंडिकार सीरीज आणि बेनेट्स ब्रिटिश सुपरबाइक रेसिंग सारख्या प्रतिष्ठित स्पर्धांना प्रोत्साहन देत आहे.

### इब्राहिम रईसी: इराणचे नवे राष्ट्राध्यक्ष

- **इब्राहिम रईसी** यांनी 05 ऑगस्ट, 2021 रोजी **इराणचे नवे राष्ट्राध्यक्ष** म्हणून शपथ ग्रहण केली. त्यांचा कार्यकाल **4 वर्षे** असेल.त्यांनी जूनमध्ये 2021 इराणच्या अध्यक्षपदाची निवडणूक 62 टक्के मतांनी जिंकली.
- 60 वर्षीय रायसी, **हसन रुहानी** यांच्यानंतर इराणचे नवे अध्यक्ष होणार आहेत. मार्च 2019 पासून ते इराणचे मुख्य न्यायाधीशही आहेत.

### झूलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाला पहिल्या महिला संचालक

- भारत सरकारने **डॉ.धृती बॅनर्जी** यांची **झूलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या** 100 वर्षांच्या इतिहासातील पहिल्या **महिला संचालक** म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता दिली.
- **2016** मध्ये झेडएसआयच्या शताब्दीपूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने बॅनर्जी यांनी **"द ग्लोरियस 100 वुमेन्स सायंटिफिक कॉन्ट्रिब्युशन इन झेडएसआय"** चे सह सहलेखन केले होते, ज्यात प्राण्यांशी संबंधित असलेल्या क्षेत्रात महिला शास्त्रज्ञांच्या योगदानाचे वर्णन केले आहे.
- **जुलै 1916** मध्ये स्थापन झालेल्या झेडएसआय चे मुख्यालय **कोलकाता** येथे असून ते पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाच्या अंतर्गत काम करते. त्याची 16 प्रादेशिक केंद्रे देखील आहेत.

### कुमार मंगलम बिर्ला व्ही च्या गैर-कार्यकारी अध्यक्षपदावरून पायउतार

- आदित्य बिर्ला समूहाचे अध्यक्ष **कुमार मंगलम बिर्ला** यांनी **व्होडाफोन आयडिया (आता व्ही)** बोर्डाचे अकार्यकारी संचालक आणि गैर-कार्यकारी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे.
- व्ही संचालक मंडळाने एकमताने सध्याचे गैर-कार्यकारी संचालक **हिमांशु कापनिया** यांची अकार्यकारी अध्यक्ष म्हणून निवड केली आहे.

.

### निवृत्त न्यायमूर्ती व्ही एम कानडे महाराष्ट्राचे नवीन लोकायुक्त

- **महाराष्ट्राचे** राज्यपाल **भगतसिंह कोश्यारी** यांनी मुख्यमंत्री **उद्धव ठाकरे** यांच्या सल्ल्यानुसार मुंबई उच्च न्यायालयाचे **निवृत्त न्यायाधीश व्ही एम कानडे** यांची महाराष्ट्राचे **नवीन लोकायुक्त** म्हणून नियुक्ती करण्यास मंजुरी दिली आहे.
- माजी लोकायुक्त, (निवृत्त) न्यायमूर्ती **एमएल ताहलियानी** यांनी **ऑगस्ट 2020** मध्ये कार्यकाल पूर्ण झाल्यानंतर हे पद रिक्त होते.

### आर्मेनियाचे पंतप्रधान म्हणून निकोल पशिनियन यांची पुनर्नियुक्ती

- 02 ऑगस्ट 2021 रोजी **निकेल पशिनियन** यांची **आर्मेनियाचे** पंतप्रधान म्हणून अध्यक्ष **आर्मेन सार्किसियन** यांच्याद्वारे पुन्हा नियुक्ती करण्यात आली आहे.
- सिव्हिल कॉन्ट्रॅक्ट पार्टीचे नेते पशिनियन यांनी जून 2021 मध्ये झालेल्या संसदीय निवडणुकांमध्ये बहुसंख्य जागा जिंकल्या.

### म्यानमारचे लष्करप्रमुख अंतरिम पंतप्रधान म्हणून नियुक्त

- म्यानमार लष्कराचे प्रमुख, वरिष्ठ **जनरल मिन आंग ह्लिंग** यांनी देशाचे **अंतरिम पंतप्रधान** म्हणून पदभार स्वीकारला आहे.
- 01 फेब्रुवारी 2021 च्या सत्ताबदलानंतर म्यानमारमध्ये सरकारची कर्तव्ये पार पाडत असलेल्या **राज्य प्रशासन परिषदेचे (एसएसी)** अध्यक्ष देखील आहेत, त्यांनी आंग सान सू कीच्या सत्ताधारी पक्षाला पदच्युत केले आहे.
- मिन आंग ह्लायिंग मार्च 2011 पासून म्यानमारच्या संरक्षण सेवांचे **कमांडर-इन-चीफ** देखील आहेत. ह्लिंग यांनी **2023** पर्यंत निवडणुका घेण्याचे वचन दिले आहे.

### बीव्हीलगारी ने प्रियंका चोप्राची जागतिक सदिच्छादूत म्हणून नियुक्ती केली

- **इटालियन** लक्झरी ब्रँड **बीव्हीलगारी** ने अभिनेत्री **प्रियंका चोप्रा जोनसची जागतिक सदिच्छादूत** म्हणून नियुक्ती केली आहे.
- महिला सक्षमीकरण, विविधता आणि समावेश या विषयांवर विशेष लक्ष केंद्रित करून जगभरात या ब्रँडचे मूल्य वाढवण्यासाठी प्रियंका या उच्च मूल्य दागिन्याच्या कंपनीची सदिच्छादूत म्हणून काम करेल.
- 2020 मध्ये, कंपनीने **"फ्लॉवर जेम्स इन इंडिया"** नावाच्या शाश्वत फुलांच्या शेती प्रकल्पासाठी परफ्यूम आणि स्वाद कंपनी फर्मेनिच यांच्याशी भागीदारी केली. **तामिळनाडूमधील** 100 कुटुंबांच्या मालकीच्या शेतांसह नवीन चमेली शेती मॉडेल तयार करणे हे या प्रकल्पाचे लक्ष्य होते.

### व्हाइस अॅडमिरल एस एन घोरमाडे: नौदल उपप्रमुख

- **व्हाइस अॅडमिरल एस एन घोरमाडे** यांनी नवी दिल्ली येथे एका औपचारिक समारंभात **नौदलाचे उपप्रमुख** म्हणून पदभार स्वीकारला आहे. त्यांनी व्हाइस अॅडमिरल **जी अशोक कुमार** यांची जागा घेतली.
- ध्वज अधिकारी एस.एन. घोरमाडे यांना **01 जानेवारी 1984** रोजी

भारतीय नौदलात प्रवेश केला. त्यांना 26 जानेवारी 2017 रोजी अति विशिष्ठ सेवा पदक (एव्हीएसएम) आणि 2007 मध्ये नौसेना पदक (एनएम) इत्यादी पुरस्कार मिळाले आहेत.




### दीपक दास: भारताचे नवीन लेखा नियंत्रक

- **दीपक दास** यांनी 01 ऑगस्ट 2021 रोजी भारताचे **25 वे लेखा नियंत्रक (सीजीए)** म्हणून पदभार स्वीकारला आहे.
- सीजीएचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी, श्री दास यांनी **केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळात (सीबीडीटी)** मुख्य लेखा नियंत्रक म्हणून काम केले.
- दीपक दास, 1986-बॅचचे **भारतीय नागरी लेखा सेवा (आयसीएएस)** अधिकारी आहेत.
- सीजीए हा सरकारचा खातेपाल असून संविधानाच्या **अनुच्छेद** 150 नुसार त्यांची नियुक्ती करण्यात येते.

## अर्थव्यवस्था बातम्या

### पंतप्रधान मोदींनी ई-रूपी डिजिटल पेमेंट सोल्यूशनचे लोकार्पण केले

- **पंतप्रधान नरेंद्र मोदी** यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे **ई-रुपी, ई-व्हाउचर-आधारित** डिजिटल पेमेंट सोल्यूशनचे लोकार्पण केले.
- डिजिटल पेमेंटसाठी **ई-रुपी** हे रोकडविरहीत आणि संपर्कहीन साधन आहे. हे क्यूआर कोड किंवा एसएमएस वर आधारित ई-व्हाउचर म्हणून काम करते, जे लाभार्थ्यांच्या मोबाईल फोनवर वितरित केले जाते.
- **आर्थिक सेवा विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय आणि राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण यांच्या सहकार्याने,** ई-आरयूपीआय व्यासपीठ **नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय)** ने त्याच्या यूपीआय व्यासपीठावर विकसित केले आहे.

### जुलै 2021 मध्ये जीएसटी संकलन ₹ 1.16 लाख कोटी

- **जुलै 2021** साठी **वस्तू व सेवा कर (जीएसटी) संकलन ₹ 1.16 लाख** कोटी होते, जे गेल्या वर्षीच्या समान कालावधीपेक्षा 33 टक्के अधिक आहे.
- जुलै 2020 मध्ये जीएसटी संकलन ₹ 87,422 कोटी होते, तर या वर्षी जूनमध्ये, 92,849 कोटी होते.

### एलआयसी आणि आयडीबीआय बँकेने रूपे क्रेडिट कार्ड ल्युमीने ,ईक्लॅट सुरु केले

- **एलआयसी कार्ड्स सर्व्हिसेस लिमिटेड** (एलआयसी-सीएसएल) ने **'ल्युमीने'** प्लॅटिनम क्रेडिट कार्ड आणि **'ईक्लॅट'** सिलेक्ट क्रेडिट कार्ड रुपे व्यासपीठावर सुरू करण्यासाठी **आयडीबीआय** बँकेबरोबर भागीदारी केली आहे.
- ही कार्डे सुरुवातीला एलआयसी पॉलिसीधारक, एजंट, तसेच महामंडळ आणि त्याच्या उपकंपन्यांच्या कर्मचाऱ्यांना उपलब्ध असतील

### एसबीआयने योनोसाठी 'सिम बाइंडिंग' सुविधा सुरू केली

- भारतातील सर्वात मोठी **स्टेट बँक ऑफ इंडिया** (एसबीआय) ने ग्राहकांना विविध डिजिटल फसवणुकीपासून वाचवण्यासाठी 'योनो' आणि योनो लाइट ॲप्स,' **सिम बाइंडिंग** 'नावाचे नवीन आणि वर्धित सुरक्षा वैशिष्ट्य सुरू केले आहे.
- नवीन सिम बाइंडिंग वैशिष्ट्याअंतर्गत, योनो आणि योनो लाइट ॲप्स फक्त त्या मोबाईलवर काम करतील ज्यांचे मोबाईल नंबर बँकेत नोंदणीकृत आहेत.

### एचडीएफसी बँकेने 'दुकानदार ओव्हरड्राफ्ट योजना' सुरू केली

- **एचडीएफसी बँकेने** सीएससी एसपीव्हीच्या साहय्याने छोट्या किरकोळ विक्रेत्यांसाठी **'दुकानदार ओव्हरड्राफ्ट योजना'** ही ओव्हरड्राफ्ट सुविधा सुरू करण्याची घोषणा केली.
- बँकेच्या म्हणण्यानुसार, किमान **तीन वर्षे** कार्यरत असलेले किरकोळ विक्रेते कोणत्याही बँकेकडून सहा महिन्यांचे बँक स्टेटमेंट देऊन या योजनेसाठी पात्र आहेत.
- एचडीएफसी बँक स्टेटमेंटच्या आधारे किमान **50,000** रुपयांपासून जास्तीत जास्त **10 लाख** रुपयांपर्यंत ओव्हरड्राफ्ट मर्यादा मंजूर करेल

### आरबीआयने जनलक्ष्मी सहकारी बँकेला 50.35 लाख रुपयांचा दंड ठोठावला

- भारतीय रिझर्व्ह बँकेने **जनलक्ष्मी सहकारी बँक, नाशिकवर** काही नियामक आवश्यकतांचे पालन न केल्याबद्दल **50.35 लाख** रुपयांचा दंड ठोठावला आहे.
- जनलक्ष्मी सहकारी बँकेवरील दंड आरबीआयने जारी केलेल्या **'प्राथमिक (शहरी) सहकारी बँकांद्वारे इतर बँकांमध्ये ठेवी ठेवणे'** आणि **'क्रेडिट इन्फर्मेशन कंपन्यांचे सदस्यत्व** (सीआयसी)' चे निर्देशांचे पालन न केल्याबद्दल दंड आकारण्यात आले आहे.

### लडाख जे अँड के बँकेतील 8.23% भागभांडवल ग्रहण करणार

- **रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने** केंद्रशासित प्रदेश **लडाखच्या** शासनास **जम्मू आणि काश्मीर बँकेतील 8.23% भागभांडवलाचे** अधिग्रहण करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे.
- जम्मू- काश्मीर सरकारच्या 30 ऑक्टोबर 2020 च्या 8.23% भागभांडवल लडाखच्या शासनाला हस्तांतरित करण्याच्या निर्णयाला यामुळे अधिमान्यता प्राप्त झाली आहे.

### मुद्रा कर्जाचे लक्ष्य वित्त वर्ष 22 मध्ये 3 ट्रिलियन रुपयांपर्यंत कमी केले.

- भारत **सरकारने पीएम मुद्रा योजना** (पीएमएमवाय) अंतर्गत कर्ज वितरणाचे लक्ष्य 2021-22 (वित्त वर्ष 22) साठी **3 ट्रिलियन** रुपये ठेवले आहे.

- हे लक्ष्य मागील वर्षापेक्षा कमी आहे.प्रधानमंत्री मुद्रा योजना (पीएमएमवाय) **बँक, बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्या (एनबीएएफसी) आणि सूक्ष्म वित्त संस्था** (एमएफआय) द्वारे तारण-मुक्त कर्ज विस्तारित करण्याची योजना आहे, ज्यामुळे लघु/सूक्ष्म व्यवसाय उपक्रम आणि अकृषिक क्षेत्रातील व्यक्तींना सक्षम केले जाऊ शकते.




- त्यांना त्यांचा व्यावसाय स्थापन किंवा विस्तार करणे आणि स्वयंरोजगार निर्माण करणे या कमाल **मर्यादा 10 लाख रुपये** पर्यंतचे कर्ज दिले जाते.
- मुद्रा म्हणजे **मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट अँड रिफायनान्स एजन्सी लिमिटेड.**

**आरबीआयची इंडसइंड बँकेला 'एजन्सी बँक' म्हणून काम करण्याची परवानगी**

- भारतीय रिझर्व्ह बँकेने **इंडसइंड बँकेला "एजन्सी बँक"** म्हणून काम करण्यासाठी सूचीबद्ध केले आहे. एजन्सी बँक म्हणून, इंडसइंड बँक सर्व प्रकारच्या सरकारी उद्योगांशी संबंधित व्यवहार करण्यासाठी पात्र ठरणार आहे.
- सूचीबद्ध **'एजन्सी बँक'** म्हणून, इंडसइंड बँक राज्य/केंद्र सरकारच्या वतीने **सीबीडीटी, सीसीबीआयसी आणि जीएसटी अंतर्गत महसूली जमा** संबंधित व्यवहार हाताळू शकते.
- **लघु बचत योजना (एसएसएस)** शी संबंधित राज्य/केंद्र सरकारच्या कार्यांच्या वतीने **निवृत्तीवेतन** देयाकांचे व्यवहार करू शकते.
- मुद्रांक शुल्काचे संकलन आणि कागदपत्रांच्या स्पष्टतेसाठी नागरिकांकडून मुद्रांक शुल्क वसूल करणे इत्यादी गोष्टींबरोबरच विविध राज्य सरकारांच्या वतीने व्यावसाय कर, व्हॅट, राज्य उत्पादन शुल्क इत्यादी राज्य करांचे संकलन करू शकते

**2021 च्या फॉर्च्यून ग्लोबल 500 सूचीमध्ये 7 भारतीय कंपन्यांचा समावेश**

- **सात भारतीय कंपन्यांना** 2021 **फॉर्च्युन ग्लोबल 500** यादीत स्थान मिळाले आहे. फॉर्च्यून ग्लोबल 500 हे जागतिक स्तरावरील आघाडीच्या 500 उपक्रमांचे वार्षिक क्रमवारी असते, जी व्यवसाय महसूलानुसार लावली जाते.
- **मुकेश अंबानी** यांची **रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड** कंपनी यादीत सर्वोच्च क्रमांकाची भारतीय कंपनी आहे, ज्याची उलाढाल जवळजवळ **$ 63 अब्ज** असून जागतिक स्तरावर **155 व्या** स्थानावर आहे.
- जागतिक स्तरावर, **वॉलमार्टने** सलग आठव्या वर्षी आणि 1995 नंतर 16 व्या वेळी उलाढालीच्या बाबतीत अव्वल स्थान पटकावले आहे.
- **चीनच्या** या यादीत **सर्वाधिक 143 कंपन्या** असून तैवानमधील कंपन्यांचा देखील यात समावेश आहे. यानंतर अनुक्रमे अमेरिका 122 आणि जपान 53 यांचा क्रमांक लागतो.
- **यादीतील भारतीय कंपन्या:** रिलायन्स इंडस्ट्रीज (155); भारतीय स्टेट बँक (205); इंडियन ऑइल (212); तेल आणि नैसर्गिक वायू (243); राजेश एक्सपोर्ट्स (348); टाटा मोटर्स (357); भारत पेट्रोलियम (394)

**आरबीआयने हेवलेट-पॅकार्ड फायनान्शिअल सर्व्हिसेसवर 6 लाख रुपयांचा दंड ठोठावला**

- भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) **बेंगळुरू** स्थित **हेवलेट-पॅकार्ड फायनान्शिअल सर्व्हिसेस** (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडला **6 लाख रुपयांचा** आर्थिक दंड ठोठावला आहे.
- 2019 च्या सर्वेक्षणद्वारे कंपनीची बिकट आर्थिक परिस्थिती तसेच (i) मोठ्या माहितीवरील केंद्रीय माहिती केंद्राकडे क्रेडिट माहिती सादर करणे आणि (ii) क्रेडिट माहिती कंपन्यांना क्रेडिट डेटा सादर करणे या वैधानिक निर्देशांचे पालन न केल्याबद्दल हा दंड ठोठावण्यात आला आहे.

**आरबीआयने जाहीर केले द्विमासिक मौद्रिक धोरण**

- **भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय)** आपले **द्विमासिक मौद्रिक धोरण** जाहीर केले आहे. आरबीआयचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्या अध्यक्षतेखालील **मौद्रिक धोरण समितीने (एमपीसी)** सलग सातव्यांदा धोरण दरांमध्ये कोणतेही बदल केले नाहीत.
- आरबीआय भारताच्या जीडीपी वाढीचा अंदाजित दर **9.5%** वर स्थिर ठेवला आहे.

**सेबीने पेमेंट बँकांना गुंतवणूक बँकर्स म्हणून काम करण्याची परवानगी**

- विविध पेमेंट मार्ग, बाजार नियामक वापरून गुंतवणूकदारांना सार्वजनिक गुंतवणूकीत सहभागी होण्यासाठी सुलभ प्रवेश प्रदान करण्यासाठी **सेबीने पेमेंट बँकांना गुंतवणूक बँकर्सची** कामे करण्यास परवानगी दिली आहे.
- गैर-अनुसूचित पेमेंट बँका, ज्यांना भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय) कडून पूर्व मंजुरी आहे, ते एखाद्या समस्येसाठी **(बीटीआय-बँकर टू अँन इश्यू)** बँकर म्हणून काम करण्यास पात्र असतील.

**ॲक्सिस बँकेने व्हॉट्सॲप बँकिंगवर दहा लाख ग्राहक**

- **ॲक्सिस बँकेने** आपल्या **व्हॉट्सॲप बँकिंग चॅनेलवर** 10 लाखांहून अधिक ग्राहकांचा टप्पा ओलांडला असून आतापर्यंत एकूण ग्राहक विनंती संख्या 6 दशलक्ष आहे.
- ॲक्सिस बँकेने जानेवारी 2021 मध्ये व्हॉट्सॲपवर बँकिंग सेवा सुरू केली होती

**सूर्योदय स्मॉल फायनान्स बँकेने 'आरोग्य आणि निरोगी बचत खाते' सुरु केले**

- **सूर्योदय स्मॉल फायनान्स बँकेने (एसएसएफबी)** ग्राहकांना त्यांची संपत्ती वाढवण्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी कोव्हीड -19 महामारी दरम्यान **'सूर्योदय आरोग्य आणि निरोगी बचत खाते'** सुरू केले आहे. या **25 लाखांचा** टॉप-अप आरोग्य विमा, वार्षिक आरोग्यसेवा पॅकेज आणि ऑन-कॉल आपत्कालीन

रुग्णवाहिका वैद्यकीय सेवा या तीन प्रमुख लाभांसह देण्यात येणार आहे.

## कराराच्या बातम्या

### जर्मनीने आयएसए फ्रेमवर्क करारावर स्वाक्षरी केली

- **8 जानेवारी 2021** रोजी सुधारणानुसार संयुक्त राष्ट्रांच्या सर्व सदस्य देशांसाठी त्याचे सदस्यत्व खुले झाल्यानंतर **आंतरराष्ट्रीय सौर आघाडी फ्रेमवर्क** करारावर स्वाक्षरी करणारा **जर्मनी 5 वा** देश बनला आहे.
- भारतातील जर्मनीचे राजदूत **वॉल्टर जे. लिंडनर** यांनी आंतरराष्ट्रीय सोलर अलायन्स फ्रेमवर्क कराराच्या स्वाक्षरी केलेल्या प्रती परराष्ट्र मंत्रालयाकडे सुपूर्द केल्या.
- आयएसएचे सदस्यत्व आधी 121 देशांपर्यंत मर्यादित होते, जे अंशतः किंवा संपूर्ण उष्णकटिबंधीय प्रदेशात होते. यामुळे जर्मनीसारख्या प्रमुख सौर ऊर्जा अर्थव्यवस्थांना युतीमध्ये सामील होऊ शकत नव्हत्या.
- पंतप्रधान **नरेंद्र मोदी** यांनी **भारत आफ्रिका शिखर परिषद** आणि नोव्हेंबर 2015 मध्ये **पॅरिस** येथे 2015 च्या संयुक्त राष्ट्रांच्या हवामान बदल परिषदेच्या आधी सदस्य देशांच्या बैठकीत हा उपक्रम सुरू केला.
- आंतरराष्ट्रीय सौर आघाडीचा फ्रेमवर्क करार नोव्हेंबर 2016 मध्ये **माराकेश, मोरोक्को** येथे स्वाक्षरीसाठी खुला झाला.

### आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ आणि एनपीसीआय मध्ये करार

- **आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सने** आपल्या ग्राहकांना युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस ऑटोपे सुविधा देण्यासाठी **नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया** (एनपीसीआय) सोबत करार केला आहे.

### भारत आणि बांगलादेश मध्ये आपत्ती व्यवस्थापन सामंजस्य करार

- **भारताने बांगलादेशसोबत** आपत्ती व्यवस्थापन, लवचिकता आणि शमन यावर भर देण्यासाठी नुकताच सामंजस्य करारावर स्वाक्ष्ऱ्या केल्या.
- तसेच बांगलादेशने **कोलिशन फॉर डिझास्टर रेझिलिएंट इन्फ्रास्ट्रक्चर** (सीडीआरआय) मध्ये सामील होण्याचे आमंत्रण स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे.
- **सीडीआरआय** ही राष्ट्रीय सरकारे, संयुक्त राष्ट्रसंघाच्या संस्था, बहुपक्षीय विकास बँका आणि खाजगी क्षेत्रातील युती आहे ज्याचे उद्दीष्ट नवीन आणि विद्यमान पायाभूत सुविधा हवामान आणि आपत्तीच्या धोक्यांसाठी लवचिकता वाढवणे आहे.

### स्टार्टअप वित्तपुरवठ्यासाठी इंडियन बँकेने आयआयटी बॉम्बेसोबत सामंजस्य करार

- **भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई** चा एक उपक्रम –**सोसायटी फॉर इनोव्हेशन अँड एंटरप्रेन्योरशिप (एसआयएनई)** सह स्टार्टअप आणि एमएसएमई साठी विशेष क्रेडिट सुविधा पुरविण्यासाठी **इंडियन बँकेने** एक सामंजस्य करार केला आहे.
- या स्टार्ट-अप्सना त्यांच्या कार्यशील भांडवलाच्या गरजांसाठी किंवा यंत्रसामग्री आणि उपकरणे खरेदी करण्यासाठी बँक **50 कोटी** रुपयांपर्यंत कर्ज देईल

## समिट आनि कॉन्फरन्स बातम्या

### भारताने ऑगस्ट 2021 साठी युएनएससी चे अध्यक्षपद स्वीकारले

- **भारताने ऑगस्ट 2021** साठी **संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे (युएनएससी)** अध्यक्षपदाचा पदभार **फ्रान्सकडून** स्वीकारला आहे. 2021-22 च्या युएनएससी चा अस्थायी सदस्य म्हणून भारतासाठी हे पहिले अध्यक्षपद आहे.
- पंतप्रधान **नरेंद्र मोदी** हे युएनएससी च्या बैठकीचे अध्यक्ष होणारे पहिले भारतीय पंतप्रधान ठरले आहेत.




## पुरस्कार बातम्या

### सायरस पूनावाला यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार जाहीर.

- पुणे-स्थित लस उत्पादक कंपनी **सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (एसआयआय)** चे अध्यक्ष **डॉ. सायरस पूनावाला** यांची 2021 च्या प्रतिष्ठित **लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी** निवड करण्यात आली आहे.
- कोव्हीड-19 महामारीच्या काळात कोव्हीशील्ड लस तयार करून दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना हा सन्मान देण्यात आला आहे.
- लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराची सुरुवात **लोकमान्य टिळक ट्रस्टतर्फे** लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीला **1 ऑगस्ट 1983** पासून करण्यात आली.
- **एक लाख रुपये रोख** आणि **सन्मानचिन्ह** असे या पुरस्काराचे स्वरूप असते.

### डिजिटल बँकिंगमधील नावीन्यपूर्णतेसाठी डीबीएसचा सन्मान

- फायनान्शियल टाइम्स प्रकाशन, **द बँकर** ने, 2021 **इनोव्हेशन इन डिजिटल बँकिंग अवॉर्ड्स** साठी **डीबीएस बँकेची** निवड केली.
- बँकेला **आशिया-पॅसिफिक विजेता** म्हणून देखील जाहीर केले आणि सायबर सुरक्षा श्रेणीमध्ये त्याच्या सुरक्षित प्रवेश आणि रिमोट वर्किंग सोल्यूशनसाठी सन्मानित केले गेले.
- **युरोमनी** प्रादेशिक पुरस्कारांमध्ये डीबीएसला **आशियाची सर्वोत्कृष्ट**

**बँक** आणि आशियाची सर्वोत्कृष्ट डिजिटल बँक असे पुरस्कार देण्यात आले.

### सी.आर. राव सुवर्ण पदक पुरस्कार विजेत्यांची घोषणा

- **द इंडियन इकोनोमेट्रिक सोसायटी (टीआयईएस)** ट्रस्टने **प्रा.सी.आर. राव** शताब्दी सुवर्ण पदक पुरस्कारासाठी दोन नामांकित अर्थतज्ञांची निवड केली आहे.
- सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ **जगदीश भगवती** आणि **सी रंगराजन** यांना पहिला सी.आर. राव शताब्दी सुवर्ण पदक (सीजीएम) प्रदान करण्यात आले आहे.

### पश्चिम बंगालला चार एसकेओसीएच पुरस्कार प्राप्त

- **ईझ ऑफ डुइंग बिझनेस** उपक्रमांतर्गत पश्चिम बंगाल सरकारला त्याच्या योजनांसाठी **चार स्कोच** पुरस्कार मिळाले आहेत.
- राज्याच्या **'सिल्पासाथी'**-ऑनलाईन सिंगल विंडो पोर्टल या योजनेला **प्लॅटिनम** पुरस्कार मिळाला, तर शहरी भागांसाठी ऑनलाइन प्रणालीद्वारे नोंदणी प्रमाणपत्राचे स्वयं-नूतनीकरण योजनेला **सुवर्ण पुरस्कार** मिळाला.
- तर ग्रामीण भागातील व्यापार परवाने ऑनलाईन जारी करणे या अभियानाला आणि **ई-नाथिकरण:** नोंदणी, तयारी आणि कागदपत्रे सादर करण्यासाठी ऑनलाइन प्रणाली या योजनेला **दोन रौप्य पुरस्कार** मिळाले आहेत.

## संरक्षण बातम्या

### हेरिटेज कोस्टल पोर्टवर बोलाविली जाणारी आयएनएस खंजर पहिली भारतीय युद्धनौका

- **भारतीय नौदल जहाज आयएनएस खंजर** हे ओडिशातील **गोपालपूरच्या वारसा किनारपट्टी बंदरावर कॉल करणारे** पहिले भारतीय नौदलाचे जहाज बनले आहे.
- **आजादी का अमृत महोत्सव** अर्थात स्वातंत्र्यचा 75 वा वर्धापन दिन आणि 1971 च्या युद्धाच्या 50 व्या वर्धापन दिनानिमित्त दोन दिवसांच्या या भेटीचे आयोजन स्वर्णिम विजय वर्षा उत्सव म्हणून करण्यात आले.

### बीआरओ ने लडाखमध्ये जगातील सर्वात उंच रस्ता बांधला

- **सीमा रस्ते संघटना (बीआरओ)** ने पूर्व लडाखमधील **उमलिंगला खिंडीत 19,300 फूट उंचीवर** जगातील **सर्वात उंच मोटरेबल रस्ता** बांधला आहे.
- याची उंची एव्हरेस्ट शिखराच्या पायथ्यापेक्षा जास्त आहे. हा **52 किमी** लांबीचा डांबरी रस्ता उमलिंगला खिंडीतून जातो जो पूर्व लडाखच्या चुमार सेक्टरमधील महत्त्वाच्या शहरांना जोडतो.

### आयएएफ मध्ये राफेल विमानांच्या दुसऱ्या तुकडीचा समावेश

- भारतीय हवाई दलाने (आयएएफ) पूर्व बंगालच्या **हसीमारा हवाई तळावर** ईस्टर्न एअर कमांड (ईएसी) मध्ये **राफेल विमानांच्या दुसऱ्या तुकडीचा** समावेश केला.

### ऑर्डनन्स फॅक्टरीने 'त्रिची कार्बाइन' हे नवीन शस्त्र आणले

- तामिळनाडूमधील **ऑर्डनन्स फॅक्टरी तिरुचिरापल्ली** (ओएफटी) ने **ट्रायका (त्रिची कार्बाइन)** नावाचे एक नवीन उच्च-तंत्र आणि कमी ध्वनी शस्त्र आणले आहे, जे **त्रिची असॉल्ट रायफल** (टीएआर) ची छोटी आवृत्ती आहे.
- ओएफटीचे महाव्यवस्थापक **संजय द्विवेदी**, आयओएफएस (इंडियन ऑर्डनन्स फॅक्टरी सर्व्हिस) यांनी एका कार्यक्रमात त्याचे अनावरण केले.

### ऑपरेशन ब्लू फ्रीडम: विशेष दलाच्या दिग्गजांचा चमू

- भारत सरकारने **सियाचिन हिमनदी** सर करण्यासाठी दिव्यांगांच्या टीमचे नेतृत्व करण्यासाठी टीम **सीएलएडब्ल्यू** ला मंजुरी दिली आहे.
- दिव्यांग लोकांच्या सर्वात मोठ्या संघासाठी हा एक नवीन विश्वविक्रम असेल. **'ऑपरेशन ब्लू फ्रीडम'** चा भाग म्हणून ही मोहीम हाती घेतली जात आहे.
- **सीएलएडब्ल्यू ग्लोबल** या **भारतीय लष्कर आणि भारतीय नौदलाच्या** विशेष दलाच्या माजी अधिकाऱ्यांच्या चमूने **2019** मध्ये ऑपरेशन ब्लू फ्रीडम सुरू केले.

## क्रीडा बातम्या

### पीव्ही सिंधूने टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकले

- भारतची आघाडीची **बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधूने** 01 ऑगस्ट 2021 रोजी टोकियो ऑलिम्पिकमध्ये महिला एकेरी स्पर्धेत चीनच्या **हीबिंगजियाओला** पराभूतकरून **कांस्यपदक** जिंकले.
- या विजयासह वैयक्तिक स्पर्धांमध्ये **दोन ऑलिम्पिक पदके** जिंकणारी सिंधू **पहिली भारतीय महिला** आणि दुसरी भारतीय खेळाडू ठरली आहे.
- यापूर्वी तिने **2016** मध्ये **रिओ ऑलिम्पिकमध्ये** महिला एकेरी बॅडमिंटनमध्ये **रौप्यपदक** जिंकले होते. 2020 टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताचे हे दुसरे पदक आहे.

### एस्टेबान ओकॉन हंगेरियन जीपी 2021 चा विजेता

- फ्रान्सच्या **एस्टेबान ओकॉनने** (अल्पाइन-रेनॉल्ट) 01 ऑगस्ट 2021 रोजी **हंगेरीच्या मोग्योरोड** येथील **हंगारोरिंग** येथे आयोजित करण्यात आलेली **हंगेरियन ग्रांप्री 2021** स्पर्धा जिंकली आहे. एस्टेबान ओकॉनसाठी हा पहिला फॉर्म्युला 1 विजय आहे.
- **सेबेस्टियन वेटेल** (ॲस्टन मार्टिन-मर्सिडीज/ जर्मनी) दुसऱ्या तर **लुईस हॅमिल्टन** (मर्सिडीज/ग्रेट ब्रिटन) तिसऱ्या स्थानावर आले.

### श्रीलंकेचा इसरु उदाना आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त

- **श्रीलंकेचा** डावखुरा मध्यमगती गोलंदाज व अष्टपैलू, **इसुरू उदाना** याने तात्काळ प्रभावाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे.

### टोकियो ऑलिम्पिक मध्ये इटलीच्या मार्सेल जेकब्सने पुरुषांच्या 100 मीटर स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले

- **इटलीच्या लामोंट मार्सेल जेकब्सने** पुरुषांच्या **100 मीटर** धावण्याच्या स्पर्धेत जमैकाचा निवृत्त धावपटू उसैन बोल्टची सद्दी संपवत **सुवर्णपदक** पटकावले.
- अमेरिकेच्या **फ्रेड केर्लीने** 9.84 च्या वैयक्तिक सर्वोत्कृष्ट वेळेसह रौप्यपदक तर कॅनडाच्या **आंद्रे डी ग्रासेने** 9.89 सेकंदात 2016 च्या कांस्य पदकाची पुनरावृत्ती केली.
- महिला वर्गात **जमैकाच्या एलेन थॉम्पसन-हेरा** हिने 100 मीटर धावण्याची शर्यत 10.61 सेकंदांच्या अवधीत पूर्ण करत सुवर्णपदक जिंकले.

- तर जमैकाच्याच **शेली-एन फ्रेझर-प्रिसने** रौप्यपदक पटकावले तर जमैकाच्याच **शेरिका जॅक्सन** कांस्यपदक जिंकले.

**अलेक्झांडर झ्वेरेवने टोकियो ऑलिम्पिकमध्ये पुरुष एकेरी टेनिसमध्ये सुवर्णपदक जिंकले**

- **जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेवने** रशियन कॅरेन खाचानोव्हचा 6-3, 6-1 असा पराभव करत टोकियो ऑलिम्पिक 2020 मध्ये टेनिस पुरुष एकेरीचे **सुवर्णपदक** जिंकले.
- एकेरी ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकणारा तो पहिला जर्मन पुरुष खेळाडू ठरला आहे.
- **1988** च्या सोल ऑलिम्पिकमध्ये **स्टेफी ग्राफ** नंतर ऑलिम्पिक टेनिस एकेरीचे सुवर्णपदक जिंकणारा झ्वेरेव दुसरा जर्मन खेळाडू ठरला आहे.




**अमेरिकेने फुटबॉलचा सीओएनसीएसीएएफ सुवर्ण चषक जिंकला.**

- **युनायटेड स्टेट्सने** गतविजेता **मेक्सिकोवर** 1-0 असा अतिरिक्त वेळेत अविस्मरणीय विजय मिळवत सातव्या **कॉनकॅफ सुवर्ण चषकावर** आपले नाव कोरले.
- अतिरिक्त वेळ संपायला फक्त तीन मिनिटे शिल्लक असतांना अमेरिकेचा बचावपटू **केलीन अकोस्टाने** मेक्सिकन गोलरक्षक अल्फ्रेडो टालावेरला चकवत गोल केला.
- मेक्सिकोचा **हेक्टर हेरेरा** स्पर्धेचा सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला. कतारच्या **अल्मोएझ अलीला** सर्वाधिक गोल करण्याचा पुरस्कार मिळाला.

**अनुराग ठाकूर यांनी पॅरालिम्पिक संकल्पना गीत "कर दे कमाल तू" चे लोकार्पण केले**

- केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री, **अनुराग सिंह ठाकूर** यांनी नवी दिल्ली येथे **भारतीय पॅरालिम्पिक चमूसाठी** थीम **साँग "कर दे कमाल तू"** चे लोकार्पण केले.
- या गाण्याचे संगीतकार आणि गायक लखनौचे दिव्यांग क्रिकेट खेळाडू **संजीव सिंग** आहेत.
- 24 ऑगस्ट 2021 पासून **टोकियो** येथे होणाऱ्या पॅरालिम्पिक खेळांमध्ये 9 क्रीडा प्रकारांमध्ये भारताचे 54 दिव्यांग-खेळाडू सहभागी होणार आहेत.

**टोकियो ऑलिम्पिक 2020 : बॉक्सर लोव्हलिना बोर्गोहेनने कांस्यपदक जिंकले**

- भारतीय बॉक्सर, **लवलिना बोर्गोहेन** अंतिम सामन्यात पोहोचण्यात अपयशी ठरली असून तिला **कांस्यपदकावर** समाधान मानावे लागले.
- चालू टोकियो ऑलिम्पिकमधील भारताचे हे तिसरे पदक आहे.
- टोकियो 2020 मध्ये **महिलांच्या वेल्टरवेट (69 किलो)** उपांत्य फेरीत ती तुर्कीच्या **बुसेनाझ सुरमेनेली** यांच्याकडून पराभूत झाली.

**भारताने जर्मनीला हरवत पुरुष हॉकीमध्ये कांस्य जिंकले**

- **भारतीय पुरुष हॉकी संघाने जर्मनीला** 5-4 असे पराभूत करत 41 वर्षांनी पहिले ऑलिम्पिक कांस्यपदक जिंकले.
- या पूर्वी, भारताने **1980** मध्ये शेवटचे ऑलिम्पिक **8 वे सुवर्णपदक** जिंकले होते.
- ओई हॉकी स्टेडियमवर **सिमरनजीत सिंगने** भारतासाठी दोन गोल केले, त्यासोबत **हार्दिक सिंग, हरमनप्रीत सिंग** आणि **रुपिंदर पाल सिंग** यांनीही गोल डागले.

**रवी कुमार दहियाने टोकियो ऑलिम्पिकमध्ये रौप्य पदक जिंकले**

- भारतीय कुस्तीपटू **रवीकुमार दहिया** याने पुरुषांच्या 57 किलो फ्रीस्टाइल प्रकारात रशियन ऑलिम्पिक समितीच्या (आरओसी) **झावर उगुएवकडून** पराभूत झाल्यानंतर **रौप्य पदक** मिळवले.
- टोकियो ऑलिम्पिकमधील भारताचे हे पाचवे पदक आणि दुसरे रौप्य आहे. **केडी जाधव, सुशील कुमार, योगेश्वर दत्त आणि साक्षी मलिक** यांच्यानंतर रवी कुमार ऑलिम्पिक व्यासपीठावर स्थान मिळवणारे पाचवे भारतीय कुस्तीपटू आहेत.

**खेल रत्न पुरस्कार आता मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार**

- **राजीव गांधी खेल रत्न पुरस्कारा** चे नाव बदलून **मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कार** असे करण्यात आले असल्याचे **पंतप्रधान नरेंद्र मोदी** यांनी जाहीर केले.
- ध्यानचंद, ज्यांचा जन्मदिवस **राष्ट्रीय क्रीडा दिवस** म्हणून साजरा केला जातो, त्यांनी हॉकीमध्ये देशासाठी तीन ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकले आहेत.
- या पुरस्काराची सुरुवात **1991-92** मध्ये करण्यात आले होते, या पुरस्काराचे स्वरूप पदक, प्रमाणपत्र आणि ₹25 लाख रोख असे आहे.
- खेलरत्न प्राप्त करणारे पहिले खेळाडू **बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद** हे होते. अलीकडच्या काही विजेत्यांमध्ये क्रिकेटपटू **रोहित शर्मा**, कुस्तीपटू **विनेश फोगाट**, महिला हॉकी संघाची कर्णधार **राणी रामपाल** यांचा समावेश आहे.

## विज्ञान आणि तंत्रज्ञान बातम्या

**इएसए ने युटेलसॅट क्वांटम उपग्रह प्रक्षेपित केला**

- **युरोपियन स्पेस एजन्सी (ईएसए)** ने **'यूटेलसॅट क्वांटम'** हा जगातील पहिला व्यावसायिक **पुन: प्रोग्राम करण्यायोग्य** उपग्रह फ्रेंच गियाना येथून **एरियन 5** रॉकेटद्वारे अंतराळात प्रक्षेपित केला. उपग्रह ऑपरेटर युटेलसॅट, एअरबस आणि सरे उपग्रह तंत्रज्ञानासह युरोपियन स्पेस एजन्सीने या उपग्रहाची निर्मिती केली आहे.
- क्वांटम उपग्रह **15 वर्षांच्या** आयुष्यादरम्यान डेटा ट्रान्समिशन आणि सुरक्षित संप्रेषणाच्या बदलत्या मागण्यांना पश्चिम आफ्रिकेपासून आशियापर्यंतच्या क्षेत्रांना प्रतिसाद देण्यास सक्षम आहे.

**इस्रो-नासा यांचे संयुक्त अभियान निसार उपग्रह 2023 ला प्रक्षेपित होणार**

- **इस्रो-नासा** संयुक्त अभियान **निसार (नासा-इस्रो सिंथेटिक अॅपर्चर**

**रडार) उपग्रह,** ज्याचा उद्देश प्रगत रडार इमेजिंगचा वापर करून जमिनीच्या पृष्ठभागाच्या बदलांचे जागतिक मापन करणे आहे, 2023 च्या सुरुवातीस प्रक्षेपित करण्याचा प्रस्ताव आहे.

- जमीन, वनस्पती आणि क्रायोस्फीअरमधील किरकोळ बदलांचे निरीक्षण करण्यासाठी पूर्ण ध्रुवीय आणि इंटरफेरोमेट्रिक ऑपरेशनच्या क्षमतेसह हे **दुहेरी बँड** (एल-बँड आणि एस-बँड) रडार इमेजिंग अभियान आहे.
- नासा **एल-बँड एसएआर** आणि संबंधित प्रणाली विकसित करत आहे तर इस्रो **एस-बँड एसएआर,** अंतराळ यान, प्रक्षेपण वाहन आणि संबंधित प्रक्षेपण सेवा विकसित करीत आहे

## पुस्तके आणि लेखक बातम्या

### कादंबरीकार कुणाल बसू यांचे नवीन पुस्तक 'इन अँन आयडियल वर्ल्ड

- प्रख्यात **कादंबरीकार कुणाल बसू** यांचे कल्पनारम्य, **"इन अँन आयडियल वर्ल्ड'** हे नवीन पुस्तक पुढील वर्षी प्रकाशित होईल, अशी घोषणा प्रकाशनगृह **पेंग्विन रँडम हाऊस इंडिया** (पीआरएचआय) ने केली आहे.

### कॅप्टन रमेश बाबू यांचे "माय ओन माझगाव" पुस्तक

- **कॅप्टन रमेश बाबू** लिखित **"माय ओन माझगाव"** नावाचे नवीन पुस्तक **इंडस सोर्स बुक्सने** प्रकाशित केले आहे. या पुस्तकात माझगाव इतिहास आणि कथा आहे.
- कॅप्टन रमेश बाबू **माझगाव डॉक** येथे भारतीय नौदलाची सेवा केल्यानंतर मुंबईतून निवृत्त झाले. कॅप्टन बाबूंनी लिहिलेली इतर पुस्तके: **"आफ्टर यू सर: अ कलेक्शन ऑफ स्कूल स्टोरीज"** आणि **"कालीकत हेरिटेज ट्रेल्स".**

### संजय गुब्बी यांनी 'लेपर्ड डायरीज – द रोझेट इन इंडिया' पुस्तक

- वन्यजीव जीवशास्त्रज्ञ, **संजय गुब्बी** यांनी बिबट्याविषयी **'लेपर्ड डायरीज – द रोझेट इन इंडिया'** नावाचे पुस्तक लिहिले, ज्यात ते बिबट्या -मानवी संघर्षावर मात करण्याच्या सूचनांसह त्याच्या खाण्याच्या सवयी, पर्यावरणीय संदर्भ आणि बिबट्याच्या संवर्धनाबद्दल सांगतात.
- **वेस्टलँडने** हे पुस्तक प्रकाशित केले आहे.
- सरकारच्या अहवालानुसार, मध्य प्रदेशात बिबट्यांची संख्या सर्वाधिक आहे, जे देशात अंदाजित एकूण संख्येच्या सुमारे 26 टक्के आहे.

### मनन भट्ट यांचे बालाकोट हवाई हल्ला 2019 वर पुस्तक

- **गरुड प्रकाशनने** प्रकाशित केलेले **"बालाकोट एअर स्ट्राइक: हाऊ इंडिया अॅव्हेंज्ड पुलवामा"** हे नवीन पुस्तक माजी नौदलाचे अधिकारी **मनन भट्ट** यांनी लिहिले आहे.
- **26 फेब्रुवारी 2019** रोजी भारतीय हवाई दलाच्या लढाऊ विमानांनी नियंत्रण रेषा ओलांडली आणि पाकिस्तानमधील **बालाकोटमध्ये** दहशतवादी स्थळे नष्ट केले.

## महत्वाचे दिवस

### 01 – 07 ऑगस्ट: जागतिक स्तनपान सप्ताह 2021

- माता आणि अर्भकांसाठी स्तनपानाच्या महत्त्वविषयी जागरूकता वाढवण्यासाठी **जागतिक स्तनपान सप्ताह** (डब्ल्यूबीडब्ल्यू) दरवर्षी **ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात,** 1 ते 7 ऑगस्ट दरम्यान पाळला जातो.
- डब्ल्यूएबीए, डब्ल्यूएचओ आणि युनिसेफद्वारे **1991** पासून वार्षिक सप्ताहाचे आयोजन केले जाते.
- 2021 ची संकल्पना: **"स्तनपानाची सुरक्षितता: एक सामायिक जबाबदारी".** (प्रोटेक्ट ब्रेस्टफीडिंग: ए शेअर्ड रिसपाँसीबिलिटी)

### 01 ऑगस्ट: मुस्लिम महिला हक्क दिन

- भारतात, तिहेरी तलाकविरोधात कायदा अस्तित्वात येण्याच्या वर्धापनदिनानिमित्त 01 **ऑगस्ट** रोजी देशभरात **"मुस्लिम महिला हक्क दिन"** पाळला जातो. 2020 मध्ये पहिल्यांदा हा दिवस आयोजित करण्यात आला.
- भारत सरकारने तिहेरी तलाकविरोधात 01 **ऑगस्ट,** 2019 रोजी कायदा केला ज्याने तिहेरी तलाक च्या सामजिक कुप्रथेस फौजदारी गुन्हा ठरविला आहे.




- या कायद्याचे अधिकृत नाव **मुस्लिम महिला (विवाह हक्क संरक्षण) अधिनियम,** 2019 असून यात मुस्लिम पुरुषांद्वारे त्वरित घटस्फोटाची प्रथा प्रतिबंधित आहे आणि कायद्याचे कोणतेही उल्लंघन केल्यास **तीन वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाची शिक्षा** होऊ शकते.

### 6 ऑगस्ट: हिरोशिमा दिवस

- दरवर्षी **6 ऑगस्ट** रोजी दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी **हिरोशिमा** येथे झालेल्या अणुबॉम्ब हल्ल्याच्या स्मृतीप्रित्यर्थ **हिरोशिमा दिवस** पाळला जातो.
- ही दुर्दैवी घटना **6 ऑगस्ट** 1945 रोजी घडली, ज्या दिवशी अमेरिकेने जपानमधील हिरोशिमा शहरावर **"लिटल बॉय"** नावाचा यूएस बी - 29 बॉम्बर विमान, एनोला गेद्वारे अणुबॉम्ब दुसरे महायुद्ध संपवण्याच्या हेतूने टाकला.

### 30 जुलै: आंतरराष्ट्रीय मैत्री दिवस

- **दरवर्षी 30 जुलै** रोजी **आंतरराष्ट्रीय मैत्री दिवस** जागतिक स्तरावर साजरा केला जातो. जीवनात मित्र आणि मैत्रीचे महत्त्व लक्षात घेण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.
- **2011** मध्ये, **संयुक्त राष्ट्र महासभेने** वंश, रंग, लिंग, धर्म इत्यादींचा विचार न करता विविध देशांच्या लोकांमध्ये मैत्रीचे दृढ बंधन निर्माण करण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय मैत्री दिन घोषित केला.

## निधन बातम्या

### जागतिक मास्टर्स सुवर्णपदक विजेत्या मान कौर यांचे निधन

- विविध जागतिक मास्टर्स अजिंक्यपद स्पर्धेच्या सुवर्णपदक विजेत्या आणि अनेक आशियाई मास्टर्स अजिंक्यपद स्पर्धेच्या पदक विजेत्या खेळाडू 105 वर्षीय **मान कौर** यांचे निधन झाले.
- त्यांनी 2007 मध्ये चंदीगड मास्टर्स अॅथलेटिक्स स्पर्धेत पहिले पदक जिंकले आणि 2011 मध्ये **राष्ट्रीय मास्टर्स अॅथलेटिक्स स्पर्धेत** 100 मीटर तसेच 200 मीटर शर्यतीत सुवर्ण जिंकले.
- 2017 मध्ये ऑकलंडमध्ये झालेल्या वर्ल्ड मास्टर्स अॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत 100+ वर्गात 100 मीटरमध्ये विजेत्या होण्याचा त्यांनी पराक्रम केला आणि त्या प्रसिद्धीझोतात आल्या.

### पद्मश्री पुरस्कार विजेत्या पद्मा सचदेव यांचे निधन

- **पद्मश्री** पुरस्कारप्राप्त आणि प्रख्यात लेखिका आणि **डोगरी भाषेतील** पहिल्या आधुनिक महिला कवयित्री **पद्मा सचदेव** यांचे निधन झाले.
- त्यांना **2001** मध्ये पद्मश्री पुरस्कार मिळाला होता आणि 2007-08 मध्ये **मध्य प्रदेश** सरकारने कवितेसाठी **कबीर सन्मानाने** सन्मानित केले होते.
- त्यांनी डोगरी आणि हिंदी भाषेत अनेक पुस्तके लिहिली आणि त्यांच्या कविता संग्रह **'मेरी कविता मेरे गीत'** ला **1971** मध्ये **साहित्य अकादमी** पुरस्कार मिळाला होता.

### फुटबॉलपटू एसएस 'बाबू' नायरन यांचे निधन

- **1956** आणि **1960** असे दोन वेळा **ऑलिम्पिक** मध्ये भारताचे प्रतिनिधित्व केलेले ज्येष्ठ **गोलरक्षक शंकर सुब्रमण्यम, उर्फ "बाबू" नायरन** यांचे निधन झाले.
- फुटबॉल आणि बास्केटबॉलमध्ये **महाराष्ट्राचे** प्रतिनिधित्व तसेच भारताचे सर्वात विश्वासार्ह गोलरक्षक म्हणूनही नावलौकिक मिळविला.
- राष्ट्रीय संघासाठी त्याच्या दशकभराच्या कारकिर्दीत **1956** च्या ऑलिम्पिकमध्ये भारताला चौथे स्थान मिळवून देण्याचा आणि **1964** च्या आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा पराक्रम समाविष्ट आहे.
- **1964** मध्ये ते महाराष्ट्राच्या **संतोष करंडक** विजेत्या संघाचा भाग होते. सुब्रमण्यम यांचा जन्म केरळमधील पलक्कड जिल्ह्यात झाला होता.

## विविध बातम्या

### शेरोझ काशिफ: के 2 शिखर सर करणारा जगातील सर्वात तरुण गिर्यारोहक

- **19 वर्षीय** लाहोर, पाकिस्तानचा गिर्यारोहक **शेरोझ काशिफ** 8,611 मीटर उंचीच्या जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात उंच शिखर **के 2** वर चढाई करणारा **जगातील सर्वात तरुण व्यक्ती** ठरला आहे.
- काशिफच्या आधी, महान गिर्यारोहक **मोहम्मद अली सडपारा** यांचा मुलगा **साजिद सडपारा, वयाच्या 20 व्या** वर्षी के 2 वर चढणारा सर्वात तरुण व्यक्ती होता.
- काशिफने वयाच्या 17 व्या वर्षी जगातील 12 वे सर्वात उंच शिखर ब्रॉडही गाठले होते. या वर्षी मे महिन्यात तो एव्हरेस्ट सर करणारा सर्वात तरुण पाकिस्तानी बनला.

## सर्व स्पर्धा परीक्षांसाठी महत्त्वाचे मुद्दे:

- वर्ल्ड अलायन्स फॉर ब्रेस्टफीडिंग संस्थापक: अन्वर फजल
- स्तनपानासाठी जागतिक आघाडीची स्थापना: 14 फेब्रुवारी 1991
- स्तनपानासाठी जागतिक आघाडीचे मुख्यालय:पेनांग
- संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे मुख्यालय: न्यूयॉर्क, युनायटेड स्टेट्स
- संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची स्थापना: 24 ऑक्टोबर 1945
- इस्रोचे अध्यक्ष: के सिवन.
- इस्रोचे मुख्यालय: बेंगळुरू, कर्नाटक.
- इस्रोची स्थापना: 15 ऑगस्ट 1969.
- नासाचे प्रशासक: बिल नेल्सन
- नासाचे मुख्यालय: वॉशिंग्टन डीसी, युनायटेड स्टेट्स
- नासाची स्थापना: 1 ऑक्टोबर 1958.
- म्यानमार राजधानी: नेप्यानाऊ
- म्यानमार चलन: कायत




- आर्मेनिया राजधानी: येरेवान
- चलन: आर्मेनियन ड्राम
- इंडियन बँकेचे मुख्यालय: चेन्नई
- इंडियन बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी: पद्मजा चुंदुरू
- इंडियन बँक स्थापना: 1907
- ओडिशाचे मुख्यमंत्री: नवीन पटनायक
- ओडिशाचे राज्यपाल: गणेशी लाल
- एसबीआयचे अध्यक्ष: दिनेश कुमार खारा.
- एसबीआयचे मुख्यालय: मुंबई.
- एसबीआयची स्थापना: 1 जुलै 1955
- एचडीएफसी बँकेचे मुख्यालय: मुंबई, महाराष्ट्र
- एचडीएफसी बँकेचे एमडी आणि सीईओ: शशिधर जगदीशन
- एचडीएफसी बँकेची टॅगलाईन: आम्हाला तुमचे जग समजते.
- केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री: जितेंद्र सिंह
- आयएमएफ मुख्यालय: वॉशिंग्टन, डी.सी. युएसए

- आयएमएफचे व्यवस्थापकीय संचालक आणि अध्यक्ष: क्रिस्टलिना जॉर्जिएवा
- आयएमएफच्या मुख्य अर्थतज्ज्ञ: गीता गोपीनाथ
- श्रीलंका राजधानी: श्री जयवर्धनेपुरा कोट्टे
- चलन: श्रीलंका रुपया.
- श्रीलंकेचे पंतप्रधान: महिंदा राजपक्षे
- श्रीलंकेचे अध्यक्ष: गोताबाया राजपक्षे
- इंडसइंड बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी: सुमंत काठपालिया
- इंडसइंड बँक मुख्यालय: पुणे
- इंडसइंड बँकेचे मालक: हिंदुजा ग्रुप
- इंडसइंड बँकेचे संस्थापक: एस. पी. हिंदुजा
- इंडसइंड बँकची स्थापना: एप्रिल 1994, मुंबई
- डीबीएस बँकेचे मुख्यालय: सिंगापूर
- डीबीएस बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी: पीयूष गुप्ता
- एलआयसी मुख्यालय: मुंबई
- एलआयसी ची स्थापना: 1 सप्टेंबर 1956
- एलआयसी चे अध्यक्ष: एम.आर. कुमार
- युरोपियन स्पेस एजन्सी ही 22 सदस्य देशांची आंतरसरकारी संस्था आहे
- युरोपियन स्पेस एजन्सीची स्थापना 1975 मध्ये झाली आणि मुख्यालय पॅरिसमध्ये आहे
- पाकिस्तानची राजधानी: इस्लामाबाद
- पाकिस्तानचे अध्यक्ष: आरिफ अल्वी
- पाकिस्तानचे पंतप्रधान: इम्रान खान
- पाकिस्तान चलन: पाकिस्तानी रुपया
- जागतिक बँकेचे मुख्यालय: वॉशिंग्टन, डीसी, युनायटेड स्टेट्स.
- जागतिक बँकेची स्थापना: जुलै 1944.
- जागतिक बँकेचे अध्यक्ष: डेव्हिड मालपास
- भारतीय सर्वोच्च न्यायालयाची स्थापना: 26 जानेवारी 1950
- भारताचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती: एन व्ही रमण्णा
- उत्तराखंडचे राज्यपाल: बेबी राणी मौर्य
- उत्तराखंडचे मुख्यमंत्री: पुष्कर सिंह धामी
- आदित्य बिर्ला ग्रुप संस्थापक: सेठ शिव नारायण बिर्ला
- आदित्य बिर्ला ग्रुपची स्थापना: 1857
- आदित्य बिर्ला ग्रुप मुख्यालय: मुंबई
- बीआरओ चे महासंचालक: लेफ्टनंट जनरल राजीव चौधरी
- बीआरओ मुख्यालय: नवी दिल्ली
- बीआरओ ची स्थापना: 7 मे 1960
- केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाचे अध्यक्ष: एम. अजित कुमार
- केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळ स्थापना: 1 जानेवारी 1964
- आरबीआयचे 25 वे गव्हर्नर: शक्तिकांत दास.
- मुख्यालय: मुंबई
- स्थापना:1 एप्रिल 1935, कोलकाता
- भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ मुख्यालय: मुंबई
- भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ स्थापना: 12 एप्रिल 1992
- भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ कार्यकारी अधिकारी: अजय त्यागी
- ॲक्सिस बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी: अमिताभ चौधरी
- ॲक्सिस बँकेचे मुख्यालय: मुंबई
- ॲक्सिस बँकेची स्थापना: 3 डिसेंबर 1993, अहमदाबाद
- जर्मनी राजधानी: बर्लिन
- जर्मनी चलन: युरो
- जर्मनीचे अध्यक्ष: फ्रँक-वॉल्टर स्टेनमेयर
- आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्स सीईओ: एनएस कन्नन
- आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्सची स्थापना: 2000
- इराणची राजधानी: तेहरान
- इराणचे चलन: इराणी तोमन
- पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री: ममता बॅनर्जी
- राज्यपाल: जगदीप धनकर

